# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१.**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३५९-२२ दिनांक २८/११/२०२२

## रेल्वे स्थानकावर रात्रीच्यावेळी प्रवाशांची लुबाडणूक करणारी टोळी जेरबंद- नवघर पोलीस ठाण्याची कामगिरी.

नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ८९५/२०२२ भा.दं.वि.सं.कलम-३९२, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आलेला असून गुन्हयातील फिर्यादी श्री रोहन दिलीप निवडुंगे वय-३३ वर्षे रा-नालासोपारा-पुर्व हे बोरीवली मेट्रो मॉल, मुंबई येथे काम करतात. दिनां ०२/११/२०२२ रोजी फिर्यादी व त्यांचा मित्र अनिकेत कांबळे हे बोरीवली येथुन मोटार सायकलवर भाईंदर रेल्वे स्टेशन, पुर्व बाजुस सुमारे-००.३० वा आले होते. त्यावेळी फिर्यादी यांना त्यांच्या राहते घरी भाईंदर रेल्वे स्टेशन येथुन नालासोपारा येथे जायचे होते. त्यावेळी फिर्यादी भाईंदर रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म जाण्यासाठी रेल्वे ब्रिजवर चढायच्या ऐवजी भाईंदर पुर्व-पश्चिम पब्लीक ब्रीजवर चढले. सदर ठिकाणी फिर्यादी हे ब्रिजवर थांबलेले असता तीन अनोळखी इसम हे ब्रिजवर आले व त्यांनी फिर्यादी यांना इधर क्यो खडा है, असे म्हणुन फिर्यादी यांना चाकुचा धाक दाखवुन त्यांच्या खिशातील मोबाईल फोन, गळयातील सोन्याची चेन अशी रुपये- ६८,४९९/- रुपये किंमतीची मालमत्ता जबरी चोरी करुन घेवुन गेले. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी वसई रेल्वे पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. मात्र सदर गुन्हयाचे घटनास्थळ हे नवघर पोलीस ठाणे हददीतील असल्याने सदरचा गुन्हा पुढील तपासकामी दिनांक १८/११/२०२२ रोजी नवघर पोलीस ठाणे येथे तपासकामी प्राप्त झाला होता.

सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार नमुद गुन्हयाचा तपास सुरु करुन नवघर पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट पाहणी केली असता तीन अनोळखी इसम यांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे दिसुन आले. त्यानंतर सदर इसम हे गुन्हा केल्यानंतर भाईंदर-पश्चिम येथे निघुन गेल्याचे दिसुन आले. फिर्यादी यांचा चोरी गेलेल्या मोबाईलबाबत तांत्रिक तपास केला असता तपासा दरम्यान नमुद गुन्हयात आरोपी नामे सुनिल टोपु राठोड रा-शहापुर, जि-यादगीर, राज्य-कर्नाटक यास दिनांक २४/११/२०२२ रोजी अटक करुन त्याच्याकडे पोलीस कोठडी दरम्यान गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याच्याकडुन फिर्यादी यांचा चोरी गेलेला मोबाईल फोन, सोन्याची चैन तसेच गुन्हयात वापरलेले हत्यार असा एकुण-६८,४९९/- रुपयांचा संपुर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्हयातील सहभागी इतर दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांना गुन्हे शाखा-१ यांनी ताब्यात घेवुन पोलीस ठाणेस हजर केले असता त्यांना देखील दिनांक २८/११/२०२२ रोजी मा. बाल न्याय मंडाळासमारे हजर ठेवण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, श्री सुशीलकुमार शिंदे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/योगेश काळे, पोउनि/अभिजित लांडे, पोह-०७०९७/भुषण पाटील, पोह-०४००४/गणेश जावळे, पोह-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोह-०००२०/जयप्रकाश जाधव, पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/सुरजसिंग घुनावत,पोशि-१७०४६/विनोद जाधव तसेच गुन्हे शाखा-०१ चे पोह-०००२३/संतोष लांडगे, पोह-०३०७६/प्रफुल पाटील यांनी केलेली आहे.

-------------ooooo-------------